PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2023-24)/ 56 / of 2024**

## परिपत्रक:

**विषय: लोकसभा सार्वत्रिक निवडणूक—२०२४ अनुषंगाने मतदान जन—जागृती कार्यक्रमात राबविण्याच्या अनुषंगाने सूचना.**

संदर्भ:— १) प्रधान सचिव, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. एमसीएम—२०२४/प्र.क्र.२२६/निवडणूक/कार्या—३३, दि. २५ मार्च, २०२४.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायमविनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाने दि. १६/०३/२०२४ च्या प्रसिध्दिपत्रकान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक—२०२४ चा कार्यक्रम घोषित करून आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, नविन मतदान नोंदणी व नव मतदानांमध्ये मतदानाप्रती जनजागृती करण्याकरिता महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत आयोजित सदर कार्यक्रमांमध्ये राजकीय पक्षांशी संबंधित व्यक्ती व राजकीय पक्षाचे नेते/ कार्यकर्ते यांचा कोणताही सहभाग असणार नाही तसेच त्यांचेकडून सदर कार्यक्रमाचा प्रचाराकरीता उपयोग करून घेता येणार नाही. याची दक्षता सर्व महाविद्यालयांनी घ्यावी.

तरी सोबत जोडलेल्या पत्रानुसार महाविद्यालयांनी अंमलबजावणी करावी.

Baliram

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

ठिकाण:—मुंबई—४०० ०३२
दिनांक:—२६ मार्च, २०२४

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.एमसीएम-२०२४/प्र.क्र.२२६/निवडणूक/कार्या-३३
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २५ मार्च, २०२४

प्रति,

प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

Upload circular 26/03

**विषय :-** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अनुषंगाने मतदान जन-जागृती कार्यक्रमात राबविण्याच्या अनुषंगाने सूचना.

**संदर्भ :-** (१) भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.४३७/६/INST/ECI/FUNCT /MCC/२०२४ (MCC Enforcement), दि.०२/०१/२०२४
(२) या कार्यालयाचे समक्रमांकित दि.०५/०३/२०२४ व दि.०७/०३/२०२४ व दि.१६/०३/२०२४

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत भारत निवडणूक आयोगाने दि.१६/०३/२०२४ च्या प्रसिध्दिपत्रकान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम घोषित करुन आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, नविन मतदार नोंदणी व नव मतदारांमध्ये मतदानाप्रती जनजागृती करण्याकरीता विद्यापीठे, महाविद्यालये व शाळांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत आयोजीत सदर कार्यक्रमांमध्ये राजकीय पक्षांशी संबंधित व्यक्ती व राजकीय पक्षाचे नेते/ कार्यकर्ते यांचा कोणताही सहभाग असणार नाही तसेच त्यांचेकडून सदर कार्यक्रमाचा प्रचाराकरीता उपयोग करुन घेता येणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत आपल्या विभागांतर्गतच्या सर्व विद्यापीठे, महाविद्यालये व शाळांना सूचना देण्यात याव्यात. ही विनंती.

आपला

(एस. चोक्कलिंगम्)
प्रधान सचिव, मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य